**Historicity Research Journal** **Impact Factor : 1.4152 (UIF)**
**ISSN : 2393-8900** **Volume - 3 | Issue - 2 | October – 2016**

# मराठी कथासाहित्य आणि कथाकार श्री.दा. पानवलकर

**प्रा.मधुकर श्रीरंग पवार**
**विभाग प्रमुख (मराठी विभाग)**
**छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज,सोलापूर.**



## ❖ प्रस्तावना :-

मराठी लघुकथेचा उगम प्राचीन लोककथा, गोष्ट यातूनच झाला आहे. पूर्वी कोणत्याही स्वरुपाची मनोरंजनांची साधने नव्हती. त्या काळात लोकांना गोष्ट सांगीतली जात असे. त्या गोष्टी लोकांना आवडायच्या, एकजन गोष्ट सांगायचा, बाकीचे कान देऊन ती गोष्ट ऐकायचे, अशा प्रक्रियेतून लघुकथा हा वाङ्.मय प्रकार उदयास आला असावा असे वाटते. हा कथात्मक साहित्याचा प्रकार असून कथन आणि श्रवन ही व्यक्तीमनाची स्वभाविक प्रवृत्ती असते. त्यामुळेच हा वाङ्.मय प्रकार लोकप्रिय होत गेला.

कादंबरीप्रमाणे कथेलाही विशिष्ट कालक्रमाणे घडलेल्या घटनांचे बनलेले कथानक असते. घटनांशी संबंधीत भाववृत्तीचे वातावरण असते. पात्रांच्या व घटनांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेले ताण, संघर्ष, गुंतागुंत हीच कथेची जमेची बाजू असते. अशा घटनांचे केलेले चित्रण म्हणजे कथा होय. व्यक्तीचित्रण त्यांचे स्वभावचित्रण आणि कथेतील घटनांचे वातावरण याला कथेत अधिक महत्त्व असते. पाश्चात्य लघुकथेप्रमाणे मराठी लघुकथा एकोणसाव्या शतकात नियतकालिकांच्या उदयाबरोबर जन्मास आली. पुढे दुसऱ्या महायुध्दानंतर मराठी कथेत बदल होत गेले. साधारण १८५० पासून ते १८९५ पर्यंत नवे रुप धारण करणाऱ्या मराठी लघुकथेला १९२० पासून स्व:ताचे अस्तित्त्व मिळाले.

१८९० सालापासून हरिभाऊ आपटे यांचे ‘करमणूक’ हे पत्र सुरु झाले. त्यावेळी हरिभाऊंनी ‘स्फुट गोष्टी’ लिहल्या, तोच काळ आधुनिक मराठी लघुकथच्या उदयाचा समजला जातो. तेराव्या शतकात म्हणजे प्राचीन मराठी साहित्यात महानुभाव साहित्याचा विचार केला जातो. स्वामी चक्रधरांनी लोककथेच्या अंगानेच लोकजागरण करण्याचा प्रयत्न केला. कथा म्हणजे कहाण्या, प्रत्येक देवदेवतांची एकेक कहाणी असते, यात भावपूर्ण वाक्य असतात. स्त्रीयांनी कहाणी, गोष्ट जतन केली. करमणूक मासिकानंतर, मनोरंजन मासिकाचा कालखंड सुरु झाला. यातून वि.सी गुर्जर यांची कथा १९१० ते १९६२ पर्यंत चालली.जवळपास त्यांनी ७०० कथा लिहील्या मराठी कथेची दृष्टी बदलून रंतनप्रधान कथा लिहली. कथेतून विनोद आणला आणि खेळकर भाषाशैलीही आणली. अशा कथांनी वाचकांच्या मनाची पकड घेतली. नियतकालीकांनी लघुकथा हा शब्द रुढ केला. दिवाकर कृष्ण यांची ‘अंगणातला पोपट’ ही पहिली कथा अधिक लोकप्रिय झाली. यशवंत-रत्नाकर या मासिकातून कथा लोकापर्यंत गेली, फडके खांडेकर यांचे युग अवतरले या कालखंडात मराठी कथा अधिक समृध्द झाली. ना.सी. फडके यांची ‘मेनाचा ठसा’ ही पहिली कथा प्रसिध्द झाली. या कालखंडाला फडके-खांडेकर लघुकथा युग म्हणून ओळखले जाऊ लागले. लघुकथेत खांडेकरांनी जीवनानुभव सामाजिक आशय आणला. म्हणून यांची कथा जीवनवादी, खांडेकरांची ‘घर कुणाचे’ ही पहिली कथा महाराष्ट्र साहित्य मासिकेत प्रसिध्द झाली. तर फडके यांनी मराठी कथेला सौदर्यवादी दृष्टी दिली, त्यांची कलावादी भूमिका चर्चिली गेली. फडक्यांच्या कथेचा वाचक बहुतांशी तरुण वर्ग अधिक होता. याच्या पुढच्या काळात विनोदी कथेला मागणी वाढली. चि.वी. जोशी आणि आचार्य अत्रे यांनी व्यक्तीजीवनातील व समाजजीवनातील विसंगतीवर प्रकाश टाकला. हसतखेळत मनोरंजन करणाऱ्या कथेचे वाचकांनी स्वागत केले. १९४३ पासून कथेचे स्वरुप बदलेले व्यक्तिगत भावनेपासून ते तीव्र सामाजिक भावनेपर्यंत तरल कथा हळूहळू लोकांच्या पसंतीला उतरु लागली. विभावरी शिरुरकर, प्रभाकर पाध्ये, कुसुमावती देशपांडे आणि वामन चोरघडे यांचीही मोलाची ठरु लागली. पुढे प्रादेशिक कथे बरोबर ग्रामिण व दलित कथा मासिकातून प्रसिध्द होऊ लागल्या. यात प्रामुख्याने र.वा.दिघे, ग.ल. ठोकळ, यांचा उल्लेख आढळतो.

मराठी कथेचा पुढचा टप्पा म्हणजे नवकथेचा होय. नवकथेचे जनक म्हणून अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर आणि पू.भा.भावे यांचा नामनिर्देश केला जातो. यांच्या मराठी कथेतून दुसऱ्या महायुध्दानंतर व्यक्तिजीवनात होणारा आंतर्बाह्य बदल आणि माणसाची मानसिक स्थिती याचे चित्र केले गेले आहे. गंगाधर गाडगीळ यांच्या कथेचे स्वरुप म्हणजे मध्यमवर्गीय माणूस रुढी, नीतीकल्पना,श्रध्दा, परंपरा, अंधश्रध्दा, दारिद्र्यामुळे जीवनाला आलेली यांत्रिकता यात दबून गेलेले मध्यमवर्गीय माणसाचे जीवन गाडगीळांनी मोकळ्या मनाने, प्रतिमा, प्रतिकांच्या साह्याने प्रखरपणे आणि उघडपणे मांडले आहे. यांनीच जुन्या गोष्टीचे स्वरुप पूर्णपणे दुर्लक्षित केले. आणि नवकथेची मांडणी केलेली दिसते.

या चार कथाकारांनी जे कार्य केले त्यांच्या विचाराला गृहीत धरुनच पुढील कथाकारांनी लेखन केले. १९४५ पासून विनोदी कथेला प्रारंभ झाला. जयवंत दळवी .पु. ल. देशपांडे यांच्या कथासाहित्याचा संदर्भ घ्यावा लागतो. द.मा.मिरासदार रा.रं. बोराडे, शंकार पाटील यांनी आपल्या कथेतून ग्रामीण जीवनील मिस्कीलपणा आणि वास्तवदर्शन करण्याचा प्रयत्न उदा. सत्यकथा-अभिरुची या मराठी मासिकातून केला. अशा कथेला लोकप्रियता मिळत गेली. १९६० नंतर मराठी कथेला नवी विचाराची पिढी लाभली. नवनिर्मीतीला प्रारंभ झाला. जी.ए. कुलकर्णी, चि.त्र्यं खानोलकर,कमल देसाई, दिलीप चित्रे व श्री.दा. पानवलकर, या समकालीन सर्व कथाकारांत जी.ए. कुलकर्णी यांची कथा मानसाच्या दुःखाचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. वेगवेगळ्या पातळीवरुन सामान्यांचे दुःख कशा पध्दतीने लोकांसमोर आणता येतील याचा विचार जी.ए.कुलकर्णी यांनी केला. यानंतरच्या कालखंडात जयवंत दळवी, विद्याधर पुंडलिक, व.पु.काळे यांच्या कथेनेही आपले वेगळेपण सिध्द् केले. या कथाविश्वात स्त्रियांचा वाटा मोलाचा आहे. उदा. विजया राजाध्यक्ष, सरिता पदकी, कमल देसाई, वसुधा पाटील व तारा वनारसे इ.

१९५० ते ७० च्या दोन दशकात ग्रामीण व दलित साहित्यात मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मीती होऊ लागली. यात ग्रामीण साहित्यात येणारे खेडूतांचे जनजीवन, अंधश्रध्दा, चालीरीती, रुढी, परंपरा शेतकरी, शेतमजूर, कामगार यांचे सुख-दुख कथेतून स्पष्ट होत गेले.याचकाळात दलित साहित्याचा प्रवाह, मराठी साहित्यात मिसळला गेला होता. दलितांचे चित्रण करणारे मराठी साहित्य यापूर्वी होते पण त्यांचा संदर्भ शोषणासी निगडीत होता. निमूटपणे शोषणाला सामोरे जाणारा दलित समाज चित्रत केला जात होता. पण दलित साहित्याच्या उदयानंतर मात्र, हे सारे संदर्भ बदलत गेले. वेदना आणि विद्रोह हे या दलित साहित्याचे अंतरंग बनले. दलित कथा लिहीणारे शंकर खरात,अणणा भाऊ साठे, बाबुराव बागुल,अर्जुन डांगळे, केशव मेश्राम,योगीराज वाघमारे,वामन होवाळ, अर्जून व्हटकर हे या दलित साहित्यातील कथाकार म्हणून ओळखले जातात.

श्री. दा. पानवलकर हे मराठी कथासाहित्यातील नामवंत कथाकार आहेत. नवकथेनंतरच्या काळातील नागर जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा यांनी लिहिल्या. यांचे एकूण सहा कथासंग्रह असून इतरही मराठी साहित्य त्यांनी लिहिले आहे. १९५० पासून त्यांच्य कथालेखनास प्रारंभ झाला. १९८१ पर्यंत त्यांच्या कथालेखनाचा प्रवास अखंडपणे चालू राहिला. त्यात गजरा १९६३, औदुंबर १९८३, सूर्य १९६८ एका नृत्याचा जन्म १९७५ जांभूळ १९८१ या शिवाय ते रोजनिशी लिहित होते. त्यांनी दोन नाटके लिहिली परंतु ती प्रकाशित झाली नाहित. म्हणून त्यांच्या कथेत नाट्य आणि लालित्य प्रत्ययास येते.

दुसऱ्या महायध्दानंतर जगाच्या पाठीवर सर्व क्षेत्रात मोठी उलथापालथ झाली. यात राजकीय,सामाजिक,सांस्कतिक आणि शैक्षणिक या बरोबरच साहित्य क्षेत्रात बदल अपेक्षित होते. इंग्रजी राजवटीतून मुक्त झालेला देश नव्या आशावादाने भारावून गेला होता. नवी स्वप्ने नवी आशा मनी धरुन साहित्याची अभिरुची घेऊ पाहात होता. त्याचा परिणाम पारंपरिक मराठी साहित्यावर झाला. यात आश्चर्य वाटण्याचे कारण नव्हते. अद्‌भत, अवास्तव पुराणकथेची जागा वास्तवादी, जीवन सन्मुख आशय प्रकट करणाऱ्या कथांनी घेतली. श्री.दा.पानवलकरांच्या कथेतून भारतीय संस्कृतीचा पोकळ मोठेपणा नाकारलेला दिसून येतो. त्यांनी माणसाच्या कतीशीलतेवर अधिक भर दिला.प्रामाणिक कष्ट करणारा जगेल यावर त्यांची श्रध्दा होती. यांची कथा अंधारात चाचपडत नाही. म्हणून तर तळपणाऱ्या सूर्यासारखी त्यांची भूमिका स्पष्ट आहे. नैतिकतेच्या गोष्टी गप्पा मारुन मन मारुन जगणे त्यांना पसंत नव्हते. प्रतिकूल परिस्थितीतून जगाशी आपले नाते जोडणारा माणूस त्यांच्या कथेतून येतो.

पानवलकरांच्या सूर्य या कथेसंबंधी असे दिसते की, या कथेवर आधारित विजय तेंडूलकरांनी अर्धसत्य ही पटकथा लिहिली. या कथेची निवड स्वताः तेंडूलकरांनीच केली. या कथेतून प्रक्षोभित होणारे, जहाल वास्तव हेच या कथेचे गमक होते. मराठी कथाविश्वात सूर्य ही कथा पानवलकरांचे लेखनाचे सामर्थ्य सिध्द करणारी आहे. पानवलकर आपल्या कथासत्रातून सुचकता स्पष्ट करतात. त्यांच्या भाषेमध्ये ताकद आहे. त्यावर त्यांनी जी जी व्यक्तीचित्रणे उभी केली आहेत ती जीवंत आहेत असे वाटते.त्यांच्या कथेत ठसठसीतपणा आणि नीडरपणा उठावून दिसतो. हेच त्यांच्या कथांचे सूत्र आहे. झळा, सूर्य, भूमी चिनाब, ओलित, हूंकार अशा त्यांच्या अनेक कथा मराठी कथेची उंची वाढविणाऱ्या वाटतात.

मराठी नवकथेच्या समकालीन श्री.दा यांच्या साकार झाल्या. त्यांच्या कथेत महत्त्वाची कथा म्हणजे हुंकार आणि आडवा बोळ या आहेत. या दोन कथा प्रखरपणे वास्तव सन्मुख झाल्याने लोकांना खुप आवडल्या. सत्य आणि भूमी या कथा सुक्ष्म आंतर्यामी असलेल्या भावनांना सचित्र करतात. सत्य या कथेमध्ये नवरा-बायको प्रतिष्ठित असले तरी रावसाहेबांना पत्नीकडे पहायला वेळ नाही. कमाई आणि ओलिस या कथेतील सुसंस्कृत वातावरण व्यवहारात रमलेल्या आणि प्रतिष्ठेची शाल पांघरलेल्या या माणसांच्या अंतर्यामी,

अखंड धगधगणारी वासनेची भूक नेहमी न्याहळत असतात. माणसांचा दांभिकपणा अपार आहे. हीच जाणिव त्यांच्या कथेतून प्रकर्षाने मांडताना दिसते.

अशा थोर मराठी कथालेखकांच्या कथेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ सूची :-**


१) मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप संपा.प्रा.म.द.हातकणंगलेकर

२) विनोद : तत्त्व आणि स्वरुप मौज प्रकाशन गौरवग्रंथ

३) मराठी कथा आणि त्यानंतरची कथा साहित्य अकादमी व मराठवाडा साहित्यपरिषद चर्चासत्रातील निबंध.

४) कथेची वाङ्.मयीन रुपे आणि मराठी कथेची बदलती रुपे —गोर्मेतक मराठी अकादमी.